मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) सकाळी पावणेऊच्या सुमारास अपघाती निधन झाले. गुरूवारी दुपारी १२ वाजून ८ मिनिटांनी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी अजित पवारांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यावेळी जमलेल्या लाखो कार्यकर्ते आणि बारामतीकरांनी अश्रू ढाळत लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

मुंबईहून बारामतीकडे जिल्हा परिषदेच्या प्रचारासाठी येत असताना बुधवारी विमान अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचे निधन झाले. यानंतर संपूर्ण राज्यभर शोकाकुल वातावरण पसरले. अजित पवारांचा मृतदेह बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयात आणण्यात आला. तेथे त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर बुधवारी संध्याकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी अजित पवारांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते.

गुरुवारी सकाळी अजित पवार यांचे पार्थिव सकाळी आठच्या सुमारास काटेवाडी येथील त्यांच्या मूळ निवासस्थानी ठेवण्यात आले. त्यानंतर त्यांच्या घरातून अंत्ययात्रेला सुरुवात करण्यात आली. बारामती येथील पेन्सिल चौकातून विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात त्यांना आणण्यात आले. त्यावेळी जमलेल्या लाखोंच्या जनसमुदायांच्या मुखातून, 'अजित दादा अमर रहे'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी उपस्थित अनेकांना त्यांचे अश्रू अनावर झाले होते. 'दादा परत या... परत या...' अशा घोषणादेखील उपस्थित जनसमुदायांकडून वारंवार देण्यात येत होत्या. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीय उपस्थित होते. अजित पवारांचे पार्थिव मैदानात उभारण्यात आलेल्या चौथऱ्यावर ठेवण्यात आले. त्यानंतर वैदिक पद्धतीने मंत्रोच्चार करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी शासकीय इतमामात बंदुकीच्या फैरी झाडत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पुणे ग्रामीण पोलिसांसह पुणे पिंपरी-चिंचवड, ठाणे, कोल्हापूर, सातारा येथील पोलिसांसह राज्य राखीव पोलीस (एसआरपी) असा ११ हजारांचा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी स्वतंत्र वाहतुकीचेदेखील नियोजन करण्यात आले होते. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी अजित पवारांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यावेळी जमलेल्या लाखो कार्यकर्ते आणि बारामतीकरांनी अश्रू ढाळत लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.



### या मान्यवरांनी वाहिली श्रद्धांजली...

» केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शंभुराज देसाई, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मेघना बोर्डीकर यांच्यासह खासदार प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ, खासदार छत्रपती शाहू महाराज, आंध्र प्रदेशचे शिक्षणमंत्री नारा लोकेश, सी. एम. रमेश, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गणेश नाईक, सुशीलकुमार शिंदे, जयंत पाटील, रवींद्र चव्हाण, अशोक चव्हाण, पंकजा मुंडे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे, गिरीश महाजन, नीरज चंद्रशेखर, महादेव जानकर, जयकुमार गोरे, डॉ. अमोल कोल्हे, राधाकृष्ण विखे- पाटील, रितेश देशमुख, नरहरी झिरवळ, राहुल कुल, दत्तात्रय भरणे, राजेश टोपे, धैर्यशील मोहिते-पाटील, मकरंद पाटील, विजय शिवतारे, मंगलप्रभात लोढा, संजय राठोड, राजेंद्र गवई, श्रीकांत शिंदे, डॉ. प्रीतम मुंडे, आकाश फुंडकर, निवेदिता माने, रुपाली चाकणकर, सचिन आहेर, सतीश चव्हाण, पोलिस महासंचालक सदानंद दाते, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

### बारामतीकरांनी पाळली शिस्त...

» अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारावेळी लाखोंचा जनसमुदाय विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जमला होता. यावेळी कोणतीही गडबड, गोंधळ न करता शिस्त पाळून त्यांच्या लाडक्या दादांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली. पहाटे पाच वाजल्यापासून चाहत्यांनी मैदानावर गर्दी केली होती. जसजशी अंत्यसंस्काराची वेळ जवळ येत होती, तसतसा लाखोंच्या संख्येने जनसमुदाय विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात जमा होत होता. प्रत्येकाला अजित पवारांना बघण्याची शेवटची इच्छा होती. मैदान परिसरात व बाहेरच्या बाजूला अजित पवारांचे अंतिम दर्शन सगळ्यांना व्हावे, यासाठी डिजिटल स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी महिलांची उपस्थितीदेखील मोठ्या संख्येने होती.

### 11 हजार पोलिसांचा बंदोबस्त...

» अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर संपूर्ण राज्यभरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच सबंध राज्यभरातून मिळेल त्या वाहनाने लोकांनी बारामतीकडे धाव घेतली. या पार्श्वभूमीवर बारामती शहर व परिसरात अभूतपूर्व पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पुणे ग्रामीण पोलिसांसह पुणे पिंपरी-चिंचवड, ठाणे, कोल्हापूर, सातारा येथील पोलिसांसह राज्य राखीव पोलीस (एसआरपी) असा ११ हजारांचा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी स्वतंत्र वाहतुकीचेदेखील नियोजन करण्यात आले होते.



### जनतेच्या मनातील नेता हरपला..

» अजित पवार हे जनतेच्या थेट संपर्कातील, आक्रमक निर्णयक्षमतेसाठी ओळखले जाणारे नेते होते. बारामती आणि राज्याच्या विकासात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असून, 'आमचा नेता हरपला' अशा भावना सामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहेत. अजित पवार यांच्या आठवणी आणि कार्य राज्याच्या राजकीय इतिहासात कायम स्मरणात राहतील, अशा शब्दांत नागरिकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# अजित पवारांच्या निधनामुळे शहर पोरके झाल्याची नागरिकांची भावना....

## लहान मुलाप्रमाणे पिंपरी-चिंचवडला जपल्याचे सांगताना फुटला अनेक नागरिकांच्या भावनांचा बांध...

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात पिंपरी-चिंचवडमधून झाली होती. अजित पवार यांनी १९९२ मध्ये पहिल्यांदा बारामती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवली होती. बारामती माझी जन्मभूमी असली, तरी पिंपरी-चिंचवड माझी कर्मभूमी असल्याचे अजितदादा नेहमी आवर्जून सांगत. रामकृष्ण मोरे यांच्यानंतर अजित पवार यांनी हे शहर घडवले. ते खऱ्या अर्थाने पिंपरी-चिंचवडचे नवनिर्माते ठरले.

बारामती लोकसभा मतदारसंघातून १९९१ मध्ये पहिल्यांदा अजित पवार यांनी निवडणूक लढवली. त्यावेळी पिंपरी-चिंचवडचा परिसर बारामती लोकसभा मतदारसंघात होता. या निवडणुकीत अजित पवार लोकसभेत निवडून गेले. तेव्हापासून त्यांचा पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात प्रवेश झाला. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सलग १५ वर्षे एकहाती सत्ता होती. या कालावधीत पिंपरी-चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. भविष्यात शहराच्या कोणकोणत्या पद्धतीच्या गरजा असू शकतात, याबाबत सखोल अभ्यास करून अजित पवारांनी पिंपरी-चिंचवड शहर विकासाचा आराखडा तयार केला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने अजितदादांच्या मार्गदर्शनावरून काळाशी सुसंगत अशा काही प्रणालींचा अवलंब केला आहे. इ-सुविधा प्रणालीच्या अंतर्गत शहरवासीयांना ऑनलाईन बिल भरणा सुविधा उपलब्ध करून दिली आहे. लोकहितासाठीचे अनेक विकासप्रकल्प दादांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आले. त्यात जेएनयूआरएमच्या माध्यमातून गरीबांसाठी गृहप्रकल्प, निगडी ओटास्कीम उभी राहिली. रस्ते, उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, उद्याने तयार झाली. नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी मोठी रुग्णालये तसेच इतरही लोकोपयोगी विविध प्रकल्प उभारण्यात आले.

बारामती माझी जन्मभूमी असली, तरी पिंपरी-चिंचवड माझी कर्मभूमी असल्याचे सांगून उद्योगनगरीचा कायापालट करणारे, आधुनिक पिंपरी-चिंचवडचे शिल्पकार उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात बुधवारी निधन झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहराशी अजित पवार यांचे जिव्हाळ्याचे, प्रेमाचे नाते होते. शहरावर मनापासून प्रेम करणारे अजित पवार यांच्या निधनामुळे शहर पोरके असे सांगताना उद्योगनगरीतील अनेक सर्वसामान्य नागरिकांना अश्रू अनावर झाले होते.

पिंपरी-चिंचवड शहराला पुढील ३० वर्षांचा विचार करुन स्वच्छ, शुध्द व पिण्यायोग्य पाणी मिळावे म्हणून निगडीला जलशुध्दीकरण केंद्रावर स्काडा प्रणाली बसवली. शहराचा पाणी टंचाई जाणवू नये म्हणून भामा-आसखेड, आंद्रा धरणात पाण्याचा आरक्षित राखीव साठा मंजूर केला. तसे च पाणी गळती रोखून शहराला स्वच्छ आणि शुद्ध पाण्यासाठी बंदिस्त पवना जलवाहिनी प्रकल्प हाती घेतला होता. पण, दुदैवाने तो प्रकल्प अद्याप अपूर्ण अवस्थेत राहिला आहे.



### अशी घडवली उद्योगनगरी....

» शहराच्या मूलभूत समस्यांची यादी अजित पवारांनी बनवली. सुलभ दळणवळणाच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक वाहतूक सेवा सक्षम कशी होईल, याचा ही पूरक अभ्यास केला. यात चांगल्या दर्जाचे रस्ते, सार्वजनिक बससेवा वाढवणे, पर्यायी वाहतुकीचे मार्ग उपलब्ध करून देणे इत्यादीचा समावेश आहे. याखेरीज आधुनिकीकरणाच्या प्रयत्नात शहरातील पर्यावरणाची काही हानी होणार नाही, याची नीट खबरदारी त्यांनी घेतली. जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून कार्यरत असताना पवारांनी शहराच्या विकास कामांसाठी मोठ्या निधीची तरतूद केली. दादांच्या मदतीमुळेच कुठल्याही अडचणीविना केंद्र सरकारकडून प्रकल्पासाठीचा निधी मिळवणे सोपे गेले.

### गुणवत्तेशी केली नाही तडजोड....

» अजित पवारांनी बारामतीप्रमाणेच पिंपरी-चिंचवड शहरावर प्रेम केले. ते भल्या पहाटे शहरात येवून विकासकामांची पाहणी करायचे. त्यामुळे पदाधिकारी, अधिकाऱ्यांवर वचक राहत होता. परिणामी, कामाच्या दर्जाशी कधीही, कोणतीही तडजोड झाली नाही. शहरातील कामे गुणात्मक झाली आहेत.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादीला महापौरपद देणे हीच अजितदादांना खरी श्रद्धांजली

## अरुण पवार यांची महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडून अपेक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत व विकासात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या योगदानाचा सन्मान राखत, तसेच त्यांना श्रद्धांजली म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौरपद देऊन मोठेपण दाखवावे, अशी अपेक्षा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री वृक्षमित्र (महाराष्ट्र शासन) तथा मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक : अध्यक्ष : अरुण पवार यांनी व्यक्त केली आहे.

अरुण पवार म्हणाले, की सध्या राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असून, स्व. अजितदादा पवार हे महायुतीतील अत्यंत महत्त्वाचे व प्रभावी नेते होते. राज्याच्या राजकारणासोबतच विकास प्रक्रियेत त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. विशेषतः पिंपरी-चिंचवड शहराच्या औद्योगिक, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या विकासकामांमध्ये अजित पवार यांची दूरदृष्टी स्पष्टपणे दिसून येते




अरुण पवार पुढे म्हणाले की, राजकारणात मतभेद असू शकतात; मात्र विकासासाठी काम करणाऱ्या नेत्याचा सन्मान हा सर्वपक्षीय असायला हवा. स्व. अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरासाठी दिलेले योगदान लक्षात घेता, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रवादी काँग्रेसला महापौरपद देणे हा एक सकारात्मक आणि समन्वयाचा संदेश देणारा निर्णय ठरेल.

उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत व विकासात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या योगदानाचा सन्मान राखत, तसेच त्यांना श्रद्धांजली म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौरपद देऊन मोठेपण दाखवावे, अशी अपेक्षा

असा निर्णय घेतल्यास महायुती सरकारकडून राजकीय परिपक्वता, सलोखा आणि विकासाला प्राधान्य देण्याची भूमिका अधोरेखित होईल, तसेच राज्यातील नागरिकांमध्येही सकारात्मक संदेश जाईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना ई-मेल द्वारे विनंती पत्र ही पाठवले आहे

# अजितदादांना आदरांजली अर्पण करण्यासाठी चिंचवडमध्ये शुक्रवारी शोकसभा

## रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे आयोजित करण्यात आली



**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री कै. ना. श्री. अजितदादा पवार यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी उद्या शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही शोकसभा रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे (दि.३०) सायंकाळी ठीक ४.०० वाजता आयोजित करण्यात आली असून, या सभेस शहरातील सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, आजी-माजी आमदार व खासदार, विविध पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, सामाजिक संस्था (एन.जी.ओ.), सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, व्यापारी तसेच विविध क्षेत्रातील प्रमुख व्यक्ती उपस्थित राहणार आहेत.या शोकसभेस सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष व माजी महापौर योगेश बहल यांनी केले आहे.

# कोरोनाच्या काळातील मार्गदर्शक नेतृत्व हरपले; राज्यासाठी मोठी हानी

## नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व हरपल्याची भावना पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केली.




**पुणे | प्रतिनिधी**

कोरोनाच्या कठीण काळात पुणे जिल्हा आणि शहराला भक्कम दिशा देणारे, प्रशासनाशी सतत संवाद राखणारे आणि नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व हरपल्याची भावना पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केली

पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना कोरोना महामारीच्या अत्यंत आव्हानात्मक टप्प्यात पवारांसोबत जवळून काम करण्याची संधी मिळाली होती. त्या काळात दर आठवड्याला बैठकांचे आयोजन करून परिस्थितीचा आढावा घेतला जात असे. संसर्ग नियंत्रण, आरोग्य यंत्रणा बळकट करणे, उपचार सुविधा वाढवणे तसेच नागरिकांमध्ये भीती न पसरता योग्य माहिती पोहोचवणे यासाठी रणनीती ठरवून त्यांची अंमलबजावणी केली जात होती.

"कोरोनाच्या संकटात पुणेकरांचे आरोग्य आणि प्राण वाचवणे हीच त्यांची सर्वोच्च प्राथमिकता होती. नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतची त्यांची काळजी अतिशय खोल, प्रामाणिक आणि सातत्यपूर्ण होती," असे राम यांनी नमूद केले. प्रशासकीय निर्णय घेताना मानवी दृष्टिकोन ठेवणे, परिस्थितीची जाण ठेवून तातडीचे निर्णय घेणे आणि अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. असे राम यांनी सांगितले.

नवल किशोर राम पुणे महापालिकेत आयुक्त म्हणून रुजू झाल्यानंतरही दिवंगत नेत्यांनी महत्त्वाच्या नागरी प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला. शहरातील स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन, नागरी सुविधा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत ते नियमितपणे चर्चा करत असत. महापालिकेतील विविध कामकाजाबाबत ते स्वतः लक्ष घालत आणि आवश्यक त्या सूचना देत. त्यामुळे प्रशासनाला काम करताना एक सकारात्मक दिशा मिळत असेही असे राम यांनी सांगितले.

व्यक्तिगत स्वभावाबद्दल बोलताना त्यांनी दिवंगत नेत्यांचे वर्णन अत्यंत सरळ, माणुसकी जपणारे आणि अधिकारी व सहकाऱ्यांबद्दल आपुलकी बाळगणारे असे केले. कठीण निर्णय घेतानाही ते संवादावर भर देत असत आणि प्रत्येक अधिकाऱ्याला समजून घेण्याचा प्रयत्न करत असत, ही त्यांची खासियत होती.

पवार यांच्या निधनामुळे केवळ राज्याचेच नव्हे, तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळालेल्या अनेक अधिकाऱ्यांचेही मोठे वैयक्तिक नुकसान झाले आहे, असे राम यांनी नमूद केले. पुणे महापालिकेच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांनी दिवंगतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या असून, "या अत्यंत कठीण काळात ईश्वर त्यांच्या कुटुंबाला दुःख सहन करण्याची शक्ती देवो," अशी प्रार्थना त्यांनी केली आहे.

### नागरी प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा

**» नवल किशोर राम पुणे महापालिकेत आयुक्त म्हणून रुजू झाल्यानंतरही दिवंगत नेत्यांनी महत्त्वाच्या नागरी प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला. शहरातील स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन, नागरी सुविधा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत ते नियमितपणे चर्चा करत असत. महापालिकेतील विविध कामकाजाबाबत ते स्वतः लक्ष घालत आणि आवश्यक त्या सूचना देत. त्यामुळे प्रशासनाला काम करताना एक सकारात्मक दिशा मिळत असेही असे राम यांनी सांगितले.**

### परिस्थितीची जाण ठेवून तातडीचे निर्णय

**» "कोरोनाच्या संकटात पुणेकरांचे आरोग्य आणि प्राण वाचवणे हीच त्यांची सर्वोच्च प्राथमिकता होती. नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतची त्यांची काळजी अतिशय खोल, प्रामाणिक आणि सातत्यपूर्ण होती," असे राम यांनी नमूद केले. प्रशासकीय निर्णय घेताना मानवी दृष्टिकोन ठेवणे, परिस्थितीची जाण ठेवून तातडीचे निर्णय घेणे आणि अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. असे राम यांनी सांगितले.**

### प्रत्येक अधिकाऱ्याला समजून घेण्याचा प्रयत्न

**» व्यक्तिगत स्वभावाबद्दल बोलताना त्यांनी दिवंगत नेत्यांचे वर्णन अत्यंत सरळ, माणुसकी जपणारे आणि अधिकारी व सहकाऱ्यांबद्दल आपुलकी बाळगणारे असे केले. कठीण निर्णय घेतानाही ते संवादावर भर देत असत आणि प्रत्येक अधिकाऱ्याला समजून घेण्याचा प्रयत्न करत असत, ही त्यांची खासियत होती.**

# खासगी चार्टर विमान सुरक्षेवर तज्ज्ञांनी उपस्थित केले प्रश्न

## क्रू प्रशिक्षण, देखभाल व रनवे सुविधांबाबत गंभीर चिंता; एएआयबीची स्वतंत्र चौकशी सुरू



**पुणे | प्रतिनिधी**

बारामती विमानतळावरील अपघातामुळे खासगी विमान कंपन्यांच्या क्रू क्षमता, प्रशिक्षण, देखभाल आणि चार्टर ऑपरेशन्सच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत, असे मत हवाई वाहतूकतज्ज्ञ धैर्यशील वंडेकर यांनी व्यक्त केले.

टेबलटॉप रनवे असलेल्या बारामती विमानतळावर लँडिंग करताना अपघात होऊन लागलेल्या आगीत विमान नष्ट होऊन विमानातील सर्वांचा मृत्यू होणे, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. संभाव्य कारणांमध्ये खराब दृश्यमानता व अशा दृश्यमानतेत विमान उतरवण्याचा वैमानिकाचा चुकलेला निर्णय, लँडिंग करताना त्यांचा अंदाज चुकणे, विमानाच्या नियंत्रणातील त्रुटी, विमानात झालेला यांत्रिक बिघाड, क्रू फटिग चा निर्णय क्षमतेवर परिणाम या सारख्या व इतर अनेक कारणांचा समावेश असू शकतो. या विमानाचे ऑपरेटर व्हीएसआर एव्हिएशन असून, 2023 मध्ये याच कंपनीच्या दुसऱ्या लिअरजेटचा मुंबईत अपघात झाला होता, असेही हवाई वाहतूक तज्ज्ञ धैर्यशील वंडेकर यांनी सांगितले.

अपघाताच्या खऱ्या कारणांचा शोध घेण्यासाठी हवाई अपघातांची चौकशी करण्याची जबाबदारी असलेल्या सरकारच्या एअरक्राफ्ट एक्सीडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो यांची स्वतंत्र चौकशी सुरू आहे. त्यांचा अंतिम अहवाल येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे अनुमान काढणे किंवा कोणावर दोषारोपण चुकीचे होईल व तसे करणे पूर्णपणे टाळले पाहिजे. असे अंदाज चुकीची माहिती पसरवतात, त्यांचा पीडितांच्या कुटुंबीयांना अतिरिक्त त्रास होऊ शकतो, हवाई वाहतुकीच्या विश्वासार्हतेवर परिणाम करण्याबरोबरच चौकशी प्रक्रियेत अडथळे निर्माण करू शकतात. चार्टर आणि नॉन-शेड्यूल्ड ऑपरेटर्सवर उड्डाणांसाठी कडक निरीक्षण, नियमित ऑडिट, क्रू फटिग मॅनेजमेंट आणि सिम्युलेटर आधारित प्रशिक्षण अधिक सक्त होणे गरजेचे आहे. डीजीसीए मधील तज्ञ कर्मचाऱ्यांची संख्या, तांत्रिक क्षमता आणि स्वायत्तता वाढवण्याची अनेक दिवसांपासून मोठी गरज आहे.

### विमानतळावरील पायाभूत सुविधा सक्षमीकरण

**» भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्राचा झपाट्याने विकास होत असताना देशात अशा दुर्घटना घडणे या क्षेत्रासाठी हानिकारक आहे. या दुर्घटनेतून सरकारने गंभीर धडे घ्यावयास हवेत. बारामती व त्यासारख्या देशातील इतर प्रादेशिक आणि अनियंत्रित विमानतळांवर हवाई वाहतुकीची सुरक्षितता राखण्यासाठी रनवे सुरक्षा क्षेत्र, नेविगेशनल एड्स, हवामान निरीक्षण उपकरणे व प्रणाली, आपत्कालीन अग्निशमन, रेस्क्यू सुविधा व इतर आवश्यक पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावयास हवीत.**

# काटेवाडीत अजित पवारांना अखेरचा निरोप; बारामती शोकसागरात

## “एकच वादा... अजित दादा”च्या घोषणांत हजारोंच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**पुणे | प्रतिनिधी**

काटेवाडी (ता. बारामती) येथील पवार फार्म परिसरात गुरुवारी (दि.२९) पहाटेपासूनच शोकाकुल वातावरण होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दर्शनासाठी व अखेरचा निरोप देण्यासाठी जनसमुदायाची अलोट गर्दी उसळली होती. पहाटेच्या अंधारातच काटेवाडीच्या दिशेने लोकांची रीघ लागली होती. महिला, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ, कार्यकर्ते, नातेवाईक, पाहुणे यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, खासदार, आमदार व विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

“एकच वादा... अजित दादा”, “अजितदादा अमर रहे”, “परत या... परत या” अशा घोषणांनी परिसर भारावून गेला होता. विशेषतः महिलांच्या टाहोने वातावरण अधिकच भावनिक झाले. अनेकांनी अश्रूंना वाट मोकळी करून आपल्या लाडक्या दादाला अखेरचा निरोप दिला. कोणाच्या डोळ्यांत अश्रू होते, तर कोणाचे शब्द गळ्याशी अडकले होते.‘आमचा माणूस गेला’या भावनेने संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले होते.





### शासकीय इतमामात मानवंदना

» शासनाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाला तिरंग्यात गुंडाळून शासकीय इतमामात मानवंदना देण्यात आली. उपस्थितांनी नतमस्तक होऊन श्रद्धांजली अर्पण केली. काटेवाडीपासून सजवलेल्या वाहनातून अंत्ययात्रा काढण्यात आली. या अंत्ययात्रेत जनसागर उसळला होता. रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून ग्रामस्थांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी आपल्या लाडक्या दादाला अखेरचा सलाम केला. काटेवाडीने केवळ एक नेता नव्हे, तर आपल्या सुख-दुःखात सहभागी होणारा आपला माणूस गमावला असल्याची भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

### बारामती शोकसागरात

» अजित पवार यांच्या जाण्याने संपूर्ण बारामती तालुका सुन्न झाला आहे. जनतेच्या मनात कायम घर करून राहिलेला हा लोकनेता आज कायमचा निघून गेला, मात्र त्यांचे कार्य, विचार आणि आठवणी काटेवाडीसह बारामतीच्या जनमानसात सदैव जिवंत राहतील, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

शासनाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाला तिरंग्यात गुंडाळून शासकीय इतमामात मानवंदना देण्यात आली. उपस्थितांनी नतमस्तक होऊन श्रद्धांजली अर्पण केली. काटेवाडीपासून सजवलेल्या वाहनातून अंत्ययात्रा काढण्यात आली. या अंत्ययात्रेत जनसागर उसळला होता. रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून ग्रामस्थांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी आपल्या लाडक्या दादाला अखेरचा सलाम केला. काटेवाडीने केवळ एक नेता नव्हे, तर आपल्या सुख-दुःखात सहभागी होणारा आपला माणूस गमावला असल्याची भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. लोकनेते आणि सामान्य जनतेचा आधारवड असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आज बारामती परिसरातून अत्यंत भावनिक वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. पहाटेपासूनच शोककळा पसरली होती. महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक, ग्रामस्थ, कार्यकर्ते, नातेवाईक यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, खासदार, आमदार व विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्नी खासदार सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, शर्मिला पवार, मुले पार्थ,जय , पुतण्या युगेंद्र भगिनी विजया, निता पाटिल, बंधू श्रीनिवास व राजेंद्र पवार यांच्यासह पवार कुटुंबीय अंत्यसंस्कार विधीत सहभागी झाले होते. “एकच वादा... अजित दादा”, “अजितदादा अमर रहे”, “परत या दादा” अशा घोषणांनी आसमंत दाटून गेला. महिलांच्या टाहोने व जनतेच्या अश्रूंनी संपूर्ण परिसर भावनाविवश झाला होता.

शासनाच्या वतीने अजित पवार यांच्या पार्थिवाला तिरंग्यात गुंडाळून शासकीय इतमामात मानवंदना देण्यात आली. उपस्थितांनी नतमस्तक होऊन श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर बारामती येथील विद्या प्रतिष्ठानपर्यंत सजवलेल्या वाहनातून अंत्ययात्रा काढण्यात आली. अंत्ययात्रेच्या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा जनतेची प्रचंड गर्दी जमली होती. महिला भगिनी, वडीलधारी नागरिक, युवक-युवतींनी अश्रूंचा बांध मोकळा करत आपल्या लाडक्या दादांना अंतिम दर्शन केले. ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करत श्रद्धांजली वाहण्यात आली. “हा केवळ नेता नव्हता, तो आमचा माणूस होता” अशी भावना प्रत्येक चेहऱ्यावर उमटत होती.

# जमिनींच्या नकाशांचा आणि 7/12 चा मेळ, पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्प जाहीर

## सातबारा उताऱ्यासोबत जमिनीच्या नकाशांचे अचूक संलग्नीकरण करण्यासाठी शासनाने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शेतजमिनींच्या मालकी हक्काबाबतचे वाद मिटवण्यासाठी आणि सातबारा उताऱ्यासोबत जमिनीच्या नकाशांचे अचूक संलग्नीकरण करण्यासाठी शासनाने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे.

राज्यातील कोट्यवधी भूखंडांना आता स्वतःचा भूआधार क्रमांक म्हणजेच युएलपीआयएन क्रमांक मिळणार असून, यासाठी पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्प सुरू करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे.

राज्यातील सर्व सर्व्हे नंबर अथवा गट नंबरमध्ये तयार झालेल्या पोटहिश्श्यांची मोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे सातबारा उताऱ्यावरील क्षेत्र व शेतजमिनींचा नकाशा अद्ययावत करून त्याचा मेळ बसणार आहे.



### राज्यस्तर ते तालुकास्तरावर समिती

» या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासनाने चार स्तरांवर समित्या स्थापन केल्या आहेत. यामध्ये राज्यस्तरावर महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती धोरणात्मक निर्णय घेईल. पोटहिस्सा मोजणी प्रकल्पाच्या कार्यकारी मंडळाची रचना करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी जमाबंदी आयुक्त असतील.

महाराष्ट्रात जमिनींचे मूळ भूमापन १८९० ते १९३० या काळात झाले होते. मात्र, गेल्या नऊ दशकांत वारसा हक्काने जमिनीची वाटणी, खरेदी-विक्री आणि हस्तांतरण यामुळे सातबारा उताऱ्यांवर नवीन पोटहिस्से तयार झाले.

सध्या राज्यात सुमारे २ कोटी १२ लाखांहून अधिक असे नवीन पोटहिस्से आहेत, ज्यांची मोजणीच झालेली नाही. परिणामी, कागदोपत्री सातबारा उतारा तयार असतो; पण नकाशात त्या जमिनीची नेमकी हद्द दिसत नाही. यामुळे शेतकरी, बँका आणि पीक विमा कंपन्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो

जमिनीचे क्षेत्र आणि हद्दी निश्चित झाल्यामुळे शेतकऱ्यांमधील आपापसांतील वाद कमी होतील. अद्ययावत माहितीमुळे बँकांना कर्जवाटप करणे आणि विमा कंपन्यांना नुकसान भरपाई देणे सोपे होईल. प्रत्येक खातेदाराला त्याच्या हिश्श्याचा स्वतंत्र नकाशा उपलब्ध होईल.

हे मंडळ दैनंदिन अंमलबजावणी आणि निधीवर नियंत्रण ठेवेल. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय विभागांमध्ये समन्वय राखला जाईल आणि तालुकास्तरीय समिती ही उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली काम करणार असून ही समिती दर आठवड्याला कामाचा आढावा घेईल. याबाबतचा शासन निर्णय महसूल विभागाचे सहसचिव संजय बनकर यांनी जारी केला आहे.